**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५९/२०२५ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश</u>**
**<u>शंकर बगले वि. गंगाबाई कोरे व इतर</u>**
**MHSO180003602025**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**<u>वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> :–**

२. दावा मिळकतीचे वर्णन –

मौजे अरळी येथील बागायत शेतजमिन गट क्र. २३०/२/ब/१, क्षेत्र २हे–०आर पैकी पश्चिम बाजूची ०.८१ आर यासी चर्तुःसिमा

पूर्वेस – शेतजमिन गट क्र. २३०/२/ब/१ पैकी
दक्षिणेस – शेतजमिन गट क्र. २२०
पश्चिमेस – शेतजमिन गट क्र. २३०/२/ब/२ पैकी राजमाने यांची शेतजमिन.
उत्तरेस – शेतजमिन गट क्र. २३१,

सदर मिळकत दाव्याचा विषय आहे.

**(सदर मिळकतीस यापुढे सोयीसाठी 'दावा मिळकत' असे संबोधित करण्यात येईल).**

३. वादीचे कथन असे आहे की, दावा मिळकत ही वादी यांच्या खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. दि.१६.०७.२०१९ रोजी वादी यांनी महादेव रुद्राप्पा पिरगुंडे यांच्याकडून रक्कम रुपये सात लाख इतक्या मोबदल्यात दावा मिळकत नोंदणीकृत खरेदीदस्ताअन्वये खरेदी घेतलेली आहे. त्यानुसार, दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी फेरफार क्र. २८८३ अन्वये वादी यांच्या नांवाची नोंद झालेली आहे. तेव्हापासून दावा मिळकत वादी यांच्या कब्जेवहिवाटीत आहे. प्रतिवादी क्र. २ हा प्रतिवादी क्र. १ चा मुलगा असून, प्रतिवादी क्र. ३ व ४ हे प्रतिवादी क्र. २ ची मुले आहेत. वादी हे प्रतिवादी क्र. १ यांचे नात्याने जावई आहेत. दावा मिळकतीपैकी पूर्व बाजूची १हे.०आर ही मिळकत प्रतिवादी क्र. १ यांच्या मालकीची आहे. दावा मिळकतीशी प्रतिवादी यांचा कोणताही हक्क हितसंबंध नाही.

४. वादीच्या कथनानुसार, शेतजमिन गट क्र. २३०/२/ब/१ ही मिळकत मुळची प्रतिवादी क्र. १ यांची मालकी कब्जेवहिवाटीची होती. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर मिळकतीपैकी पश्चिम बाजूची ०हे.८१आर मिळकत महादेव पिरगुंडे यांना दि.१५.०९.२०१५ रोजी नोंदणीकृत खरेदीखतान्वये विक्री केलेली होती. त्यानुसार महादेव पिरगुंडे यांच्या नावाची नोंद मिळकतीच्या ७/१२ पत्रकी झाली होती. त्यानंतर वादी यांनी महादेव पिरगुंडे यांच्याकडून दावा मिळकत खरेदी केलेली असून, तेव्हापासून वादी हे दावा मिळकतीत मालकीहक्काने कब्जेवहिवाट करीत आहेत. वादी यांनी दावा मिळकतीमध्ये उसाचे पिक घेतलेले असून, उस गाळपासाठी पाठविलेला आहे. असे असताना, प्रतिवादी क्र. १ या प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्या साहय्याने दावा मिळकतीतील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. प्रतिवादी हे जाणीवपूर्वक दावा मिळकत कसण्यास व वहिवाटण्यास हरकत अडथळा करीत आहेत. माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये उसाचे पिक काढल्यानंतर वादी मशागतीसाठी गेले असता, प्रतिवादी क्र. १ च्या सांगण्यावरुन प्रतिवादी क्र. २ यांनी मशागत करु दिली नाही. तसेच वादी यांनी दावा मिळकतीत यायचे नाही, दावा मिळकत आमची आहे, असे म्हणून मशागत करण्यास प्रतिबंध केला. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे प्रतिवादीने वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल अशी कृती करु नये, अशी प्रतिवादीविरुध्द तुर्तातूर्त ताकिद देण्यात यावी.

५. प्रतिवादी क्र. २ व ३ हे दाव्याच्या कामी हजर होवून सुध्दा त्यांनी त्यांची लेखी कैफियत व म्हणणे मुदतीत दाखल केले नसल्याने, त्यांचेविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व ४ यांना दाव्याचे समन्स व अर्जाची नोटीस मिळून देखील ते दाव्याकामी हजर राहिले नसल्याने, त्यांचेविरुध्द दावा हा एकतर्फा चालविण्याबाबत आदेश पारित करण्यात आलेला आहे.

६. वादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणातील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत. त्याखालील दिलेल्या कारणांसाठी मी त्यांचे निष्कर्ष नोंदविले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे लाभात प्रथमदर्शनी केस असल्याचे वादीने | होय. |

| | | |
|---|---|---|
| | सिध्द केले काय? | |
| २. | वादीचे लाभात न्यायाचा समतोल असल्याचे वादीने सिध्द केले काय? | होय |
| ३. | मनाई हुकून न दिल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल, असे वादीने सिध्द केले काय? | होय. |
| ४. | आदेश कोणता? | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

७. प्रस्तुत अर्जाच्या पृष्टयर्थ वादीने कागदपत्रे यादी नि.क्र.४ सोबत नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. ३२८६/२०१९ ची प्रत, फेरफार क्र. २८८३ ची संगणकीय प्रत, फेरफार क्र. २४६४, ८६७ च्या छायांकित प्रती, खाते क्र. ११८२ चा ८अ उतारा, दावा मिळकतीचा ७/१२ उतारा असे कागदपत्र दाखल केले आहेत.

८. सकृतदर्शनी केस म्हणजे दिवाणी पक्षकाराने त्याचे कायदेशीर कथनांबाबत सबळ पुरावा सादर करणे होय. याठिकाणी सकृतदर्शनी केस शाबीत करताना वादींना त्याच्या दाव्यातील कथनांतील सर्व बाबी संदर्भात सबळ पुरावा देणे गरजेचे आहे. परंतू जर वादीस त्याचे मागणीस दुजोरा देणारा सबळ पुरावा मांडता आला नाही, तर प्रतिवादीच्या हक्कात निर्णय देणे अनिवार्य ठरते. कारण दिवाणी केसमध्ये न्यायालयास स्वतःची बाजू पटवून देण्याची प्रथम व महत्वपूर्ण जबाबदारी ही नेहमी वादीचीच असते.

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता :**

९. सदरचे तिन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

१०. वादीच्या कथनानुसार, दावा मिळकत ही मुळची प्रतिवादी क्र. १ यांची मिळकत होती. प्रतिवादी क्र. १ यांनी दि.१५.०९.२०१५ रोजी दावा मिळकत महादेव पिरगुंडे यांना खरेदी दिली. त्यानंतर महादेव पिरगुंडे यांनी सदरची मिळकत वादीस खरेदी दिली. तेव्हापासून वादी सदर मिळकतीचा मालक असून, त्यामध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे. वादी यांनी त्यांच्या कथनापृष्टर्थ्य दाखल केलेल्या फेरफार क्र. २४६४ चे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ यांनी दि.१५.०९.२०१५ रोजी गट क्र. २३०/२/ब/१ क्षेत्र

२हे.०आर पैकी पश्चिम बाजूची ०हे.८१आर ही मिळकत महादेव पिरगुंडे यांना खरेदी दिल्याचे दिसून येते. तसेच नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. ३२८६/२०१९ चे अवलोकन केले असता, वादी यांनी महादेव पिरगुंडे यांच्याकडून दि.१६.०७.२०१९ रोजी गट क्र. २३०/२/ब/१ पैकी पश्चिमेकडील ०हे.८१आर इतके क्षेत्र खरेदी घेतलेले आहे. सदर खरेदीखताची नोंद फेरफार क्र. २८८३ ने मंजूर होवून, गट क्र. २३०/२/ब/१ पैकी ०हे– ८१आर इतक्या क्षेत्रास वादीच्या नांवाची नोंद झाल्याचे दिसून येते. वादी यांनी महादेव पिरगुंडे यांच्याकडून प्रतिवादी क्र. १ यांनी खरेदी दिलेले क्षेत्र म्हणजेच दावा मिळकत खरेदी घेतल्याचे दिसून येते. सदर खरेदीखतामध्ये ८१आर क्षेत्राच्या चर्तुःसिमा नमूद केलेल्या आहेत. खरेदीखतान्वये दावा मिळकतीचा ताबा वादीस दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीत, वादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येते. न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाट हरकत अडथळा केल्यास, वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारित करणे आवश्यक आहे. वादीचा मनाई अर्ज नामंजूर केल्यास, वादीचे नुकसान होणार आहे. याउलट मनाई दिल्यास प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. वरील चर्चेच्या अनुषंगाने, मुद्दे क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u> :**

**११.** मुद्दे क्र.१ ते ३ करिताचे निष्कर्षाच्या अनुषंगाने, मी मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

**१.** वादीचा तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी यांनी दाव्याचा अंतिम निर्णय होईतोपर्यंत वादी यांच्या दावा मिळकतीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये, अशी त्यांना तुर्तातूर्त ताकिद देण्यात येते.

**३.** अर्जाचा खर्च दाव्याच्या निकालाच्या वेळी ठरविण्यात येईल.

MEGHA SHASHIKANT MALI Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI Date: 2026.03.17 13:15:37 +0530

**(एम. एस. माळी)**

दिनांक – १३/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer Grade III : P.T. Jadhav

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order decided on : 13.03.2026

(d) Order uploaded on : 13.03.2026